पुढारी

# रंगभूमीवर वास्तवदर्शी नाटके हवीत

## १०० व्या नाट्यसंमेलनात शरद पवार यांचे प्रतिपादन

**पिंपरी- चिंचवड : पुढारी वृत्तसेवा**

नाटक हे ज्ञान आणि मनोरंजनाचे साधन आहे. निखळ मनोरंजन करणारी, आशयप्रधान आणि वास्तवावर भाष्य करणारी नाटके रंगभूमीवर सादर व्हायला हवीत, असे मत प्रायोगिक व व्यावसायिक, बाल रंगभूमीला १०० व्या नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले. ज्येष्ठ कलाकारांच्या मानधनात वाढ करावी, नाटकाच्या तिकिट दरात कपात करावी, प्रायोगिक आणि बालरंगभूमीला सरकारन विशेष अनुदान द्यावे, अशा मागण्याही पवार यांनी आपल्या भाषणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे

१०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचा उद्घाटन सो-हळा शुक्रवारी सकाळी पिंपरी-चिंचवड येथे पार पडला. त्यावेळी स्वागताध्यश्र व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे तहहयात विश्वस्त या नात्याने ते बोलत होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ९९ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल, आमदार उमा खापरे, आमदार अण्णा बनसोडे, आमदार श्रीरंग बारणे, उद्योगमंत्री उदय सामंत, अभिनेते मोहन जोशी, अशोक हांडे, डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले. अ. भा. म. नाट्य परिषद पिंपरी शाखेचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, उपाध्यक्ष सुरेशकुमार साकला, उपाध्यक्ष नरेश गडेकर, अ. भा. म. नाट्य परिषद कोथरूड शाखेचे अध्यक्ष सुनील महाजन, पुणे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, पिंपरी - चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते.

या सोहळ्यात ९९ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी यांनी १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल यांना संमेलनाअध्यक्षांची सूत्रे सुपूर्द केली.

टीव्ही, चित्रपट आणि आता समाजमाध्यमे, ओटीटी सारख्या माध्यमांची आव्हानं सहन करत मराठी रंगभूमी उभी आहे, असे सांगत शरद पवार यांनी मराठी नाट्यसृष्टीला योगदान देणाऱ्या यासर्व रंगकर्मीचा नाटकानिशी उल्लेख पवार यांनी केला. नाटक किंवा चित्रपटाने तिकिट खिडकीवर गल्ला कमावला की ते नाटक,, चित्रपपट यशस्वी झाले असे आपल्याकडे समजले जाते. कलाकारांच्या एकत्र समूहाने सादर होणारी नाटक ही जीवंत कला आहे. नटराजाची सेवा करतांना बऱ्याचदा लक्ष्मी प्रसन्न होत नाही, हे वास्तव पवार यांनी मांडले. नाटक सादर करतांना निखळ मनोरंजनावर भर दिला जातो, त्यामुळे अनेकदा सामाजिक राजकीय विषयांना हात घातला जात नाही, आपल्याकडे अजून ब्लॅक कॉमेडीसारखा प्रकार हाताळला जात नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधल.

प्रशांत दामले म्हणाले, आम्हा कलाकारांसाठी नाट्य संमेलन दिवाळी असते. प्रत्येक जण नाटक, ओटीटी, सिनेमा यामध्ये काम करत असतो. मात्र सगळे यामधून वेळ काढून या संमेलनासाठी येतात.

### नाटक करणाऱ्यांना मुभा द्या-जब्बार पटेल

नाटक करणाऱ्यांना नाटकांतून जे म्हणायचं, ते म्हणू द्या, त्याला सेन्शॉरशीप लावू नका, नाटकवल्यांनी नाटकांमधून आपल्या म्हणायचे ते मांडीतील त्यातून समाज प्रबोधनच होईल. असे प्रतिपादन १०० व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल यांनी केले. संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात सूत्रे स्वीकारल्यानंतर केलेल्या भाषणात वरील मुद्द्यावर भर दिला. नाटक हे देवलोकांपासून सुरू झाले, ते पृथ्वीसाठी कधीच नव्हे, देव लोकांकडून नाटकात स्वत:चे कौतुक होते, म्हणून राक्षसांनी नाटके पाडायला सुरुवात केली, हे नाट्यशास्त्रात सांगितले आहे. विद्यापीठ पातळीवर सादर होणाऱ्या नाटकांना मुभा द्या. व्यावसायिक रंगभूमी प्रगल्भ होण्यासाठी कलाकारांना कलाकारांना प्रशिक्षण मिळाले तर रंगभूमीला वेगळे स्वरूप प्राप्त होईल, रंगभूमीवरील कलाकारांच्या मानधनात वाढ व्हावी, संशोधनाचे काम होण्याची गरज पटेल यांनी व्यक्त केली. पटेल म्हणाले, राज्याच्या प्रत्येक विद्यापिठात नाट्य विभाग आहे सरकारने प्रत्येक विद्यापीठाच्या नाट्य विभागाला अनुदान दिले पाहिजे. तसेच इथे सादर होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नाटकांना सेन्सॉरशिप लावू नये असे त्यांनी यावेळी सांगितले.

